# MAHARASHTRA ACT No. VIII OF 1972

## THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES (POSTPONEMENT OF ELECTIONS DUE TO THE EMERGENCY) ACT, 1972

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढिल अधिनियमास राज्यपाल यांची संमती, दिनांक १७ एप्रिल १९७२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, या द्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. VIII OF 1972

## AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF ELECTIONS TO COMMITTEES OF CO-OPERATIVE SOCIETIES DUE TO THE PRESENT STATE OF EMERGENCY

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २१ एप्रिल १९७२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८

### विद्यमान आणीबाणीच्या परिस्थितीमुळे सहकारी संस्थांच्या समित्यांच्या निवडणुका पुढे ढकलण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** विद्यमान आणीबाणीच्या परिस्थितीमुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याच्या व अशा संस्थांच्या विद्यमान सदस्यांच्या किंवा अशा संस्थांचा कारभार पाहण्यासाठी नेमलेल्या प्रशासकांच्या पदावधीत वाढ करण्याच्या प्रयोजनासाठी, तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव, प्रारंभ व मुदत.**

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (आणीबाणीमुळे निवडणुका पुढे ढकलणे) अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल.

(२) तो, १७ डिसेंबर १९७१ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

(३) तो, आणीबाणीची उद्घोषणा अंमलात असेल त्या मुदतीत, अथवा राज्य शासनाकडून याबाबतीत शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल अशी अगोदरची तारीख, अथवा राज्य शासनाकडून तशाच रीतीने अधिसूचित करण्यात येईल अशी (उक्त उद्घोषणा अंमलात असण्याचे बंद झाल्यानंतरच्या सहा महिने मुदतीच्या आतील असणारी) नंतरची तारीख धरून, त्या तारखेपर्यंत, अंमलात राहील, आणि त्यानंतर तो समाप्त होईल ; हा अधिनियम समाप्त झाल्यानंतर, मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे, जणू काही महाराष्ट्र अधिनियमाद्वारे तो रद्द झाला असल्याप्रमाणे, लागू होईल.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "प्रशासक", "समिती" आणि "संस्था" यांचा अर्थ, त्या संज्ञांना सहकारी संस्था अधिनियमात जो अर्थ नेमून देण्यात आला आहे तोच असेल ;

(ब) "आणीबाणीची उद्घोषणा" म्हणजे, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३५२ च्या खंड (१) अन्वये, भारताच्या राष्ट्रपतींनी, ३ डिसेंबर १९७१ रोजी काढलेली, उद्घोषणा ;

(क) "सहकारी संस्था अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.

सहकारी संस्थांच्या समित्यांच्या निवडणुका पुढे ढकलणे. ३. (१) सहकारी संस्था अधिनियम आणि त्याखालील नियम व उपविधी यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) हा अधिनियम अंमलात असेल त्या मुदतीत, कोणत्याही संस्थेच्या समितीची किंवा कोणत्याही संस्थेच्या समितीतील कोणतीही तात्पुरती रिकामी झालेली जागा भरण्यासाठी, कोणतीही निवडणूक घेण्यात येणार नाही; परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, कोणत्याही अशा निवडणुकीस प्रारंभ झाला असेल आणि उमेदवारी मागे घेण्याची तारीख उलटून गेली असेल त्याबाबतीत, अशी निवडणूक पूर्ण करण्यात येईल ;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस, समित्यांचे [खंड (अ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे ज्यांची निवडणूक पूर्ण व्हावयाची असेल अशा समित्या वगळून] जे सदस्य पदावर असतील (हा अधिनियम अंमलात असल्याच्या मुदतीत कोणत्याही वेळी, उक्त तारखेपूर्वी किंवा त्या तारखेनंतर त्यांचा पदावधी संपलेला असो किंवा संपणार असो) त्यांचा पदावधी वाढविण्यात आला असल्याचे किंवा यथास्थिति, वाढविण्यात येणार असल्याचे मानण्यात येईल आणि असे सदस्य, हा अधिनियम अंमलात असेल त्या मुदतीत पद धारण करण्याचे चालू ठेवतील ;

(क) कोणत्याही संस्थांचा कारभार पहाण्यासाठी सहकारी संस्था अधिनियमाचे कलम ७८, पोट-कलम (१) याअन्वये नेमण्यात आलेल्या, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस जे पदावर होते अशा प्रशासकांचा पदावधी (हा अधिनियम, अंमलात असल्याच्या मुदतीत कोणत्याही वेळी, उक्त तारखेपूर्वी किंवा त्या तारखेनंतर त्यांचा पदावधी संपलेला असो किंवा संपणार असो) वाढविण्यात आला असल्याचे किंवा यथास्थिति, वाढविण्यात येणार असल्याचे मानण्यात येईल आणि असे प्रशासक, हा अधिनियम अंमलात असेल त्या मुदतीत पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही संस्थेच्या समितीच्या सदस्याची किंवा सदस्यांची निवडणूक घेण्याबद्दल निदेश देणारा, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, कोणत्याही न्यायालयाने दिलेला किंवा काढलेला न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांवर परिणाम होणार नाही आणि अशी निवडणूक घेण्यात येईल व ती पूर्ण करण्यात येईल आणि न्यायालयाच्या निदेशानुसार समितीची रचना स्थापन करण्यात येईल, परंतु अशा रीतीने रचना करण्यात आलेल्या समितीचे सदस्य, हा अधिनियम अंमलात असेल त्या मुदतीत पद धारण करतील.

(सदस्य) स्वीकृत करून घेण्याची शक्ती. ४. प्रत्येक संस्थेच्या समितीस, आपल्या सदस्यांच्या राजीनाम्यामुळे, मृत्युमुळे किंवा अन्य कारणामुळे रिकामी झालेली कोणतीही जागा भरण्यासाठी, यावाबतीत यथोचितरीत्या अर्हताप्राप्त असेल अशा कोणत्याही सदस्यास, स्वीकृत करून घेण्याची, शक्ती असेल.

तात्पुरत्या समित्यांची रचना. ५. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी किंवा त्यानंतर नोंदणी झालेल्या एखाद्या संस्थेच्या बाबतीत आणि संस्थेच्या नोंदणीसाठी केलेल्या अर्जात जे सम्मिलित झाले असतील अशा सर्व व्यक्तींची पहिली सर्वसाधारण सभा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस किंवा त्यानंतर, घेण्यात यावयाची असेल त्याबाबतीत, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ याच्या नियम ५९ ला अनुसरून हंगामी समितीची रचना करण्यात येईल आणि अशा रीतीने रचना करण्यात आलेल्या हंगामी समितीचे सदस्य हे, हा अधिनियम अंमलात असेल त्या मुदतीत पद धारण करतील.

६. कलम ३ अन्वये ज्यांचा पदावधी वाढविण्यात आला असल्याचे किंवा यथास्थिति वाढविण्यात येणार असल्याचे मानण्यात येईल असे, कोणत्याही संस्थांच्या समित्यांचे सर्व सदस्य आणि त्यांचा कारभार पहाण्यासाठी नेमण्यात आलेले सर्व प्रशासक हे, वाढविण्यात आलेल्या मुदतीतही, असा सदस्य म्हणून किंवा यथास्थिति प्रशासक म्हणून सर्व शक्तींचा वापर करण्यास आणि सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम असतील आणि तो पदावधी वेळीच वाढविण्यात आला नव्हता किंवा अन्यथा तो यथोचितरीत्या वाढविण्यात आला नव्हता किंवा वाढविण्यात आलेल्या कालावधीत समिती, सदस्य किंवा प्रशासक यांस, समितीच्या, सदस्यांच्या किंवा यथास्थिति, प्रशासकाच्या सर्व शक्तींचा वापर करता आला नव्हता आणि सर्व कर्तव्ये आणि कामे पार पाडता आली नव्हती याच केवळ कारणावरून, उक्त कालावधीत अशा कोणत्याही समितीने, सदस्याने किंवा प्रशासकाने केलेल्या कृति अवैध असल्याचे मानण्यात येणार नाही किंवा त्यासंबंधी कोणत्याही न्यायालयात हरकत घेण्यात येणार नाही. समित्यांच्या आणि कलम ३ अन्वये ज्यांचा पदावधी वाढविण्यात आला असेल अशा सदस्यांच्या आणि प्रशासकांच्या कृतींची विधिग्राह्यता.

७. या अधिनियमाद्वारे अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, सहकारी संस्था अधिनियम ह्या, संबंधित संस्थेला इतर सर्व बाबतीत लागू असेल. सन १९६१चा महाराष्ट्र अधिनियम चोवीस लागू करणे.

८. या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्याच्या बाबतीत किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा सहकारी संस्था अधिनियमाचे किंवा संस्थांशी संबंधित अशा इतर कोणत्याही विधीचे उपबंध, या अधिनियमात असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात अंमलात आणण्याच्या बाबतीत कोणतीही अडचण उद्भवेल तर, राज्य शासनास, आदेशाद्वारे, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक वाटेल अशी, प्रसंगानुरूप कोणतीही गोष्ट करता येईल. अडचण दूर करणे.

९. (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (आणीबाणीमुळे निवडणुका पुढे ढकलणे) अध्यादेश, १९७१ ह्या (त्याचे कलम ८ वगळून), याद्वारे, रद्द करण्यात येत आहे. सन १९७१चा महाराष्ट्र अध्यादेश दहा रद्द करणे व व्यावृत्ती.

(२) अशा रीतीने (अध्यादेश) रद्द करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट अथवा कोणतीही कृती ही, या अधिनियमाच्या संबंधित उपबंधान्वये केलेली गोष्ट किंवा कृती असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

के. भा. आराध्ये,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.